# 2018 - 19

## मराठी वाङ्मय मंडळ २०१९

प्रत्येकवर्षी मराठी विभागाचे वतीने विद्यार्थ्यांमध्ये वांङ्मयाविषयी रुची वाढावी व वांङ्मयीन क्षेत्रातील नवनव्या प्रवृत्तींची जाणीव व्हावी या हेतून मराठी वांङ्मय मंडळाचे गठण करण्यात येते. शैक्षणिक सत्र २०१८–१९ या वर्षात मराठी वाङ्मय मंडळाचे वतीने पुढील कार्यक्रम घेण्यात आले.

१. मंडळ गठण :–

दि.३० ऑगस्ट २०१८ रोजी मराठी वाङ्मय मंडळाच्या कार्यकारिणीचे गठण करण्यात आले.

| अ.क्र. | विद्यार्थी प्रतिनिधीचे नांव | वर्ग | पद |
|---|---|---|---|
| ०१ | भगवान तेलंग्रे | बी.ए. भाग ३ | अध्यक्ष |
| ०२ | कु. कल्याणी रमेश भोसले | बी.ए. भाग २ | सचिव |
| ०३ | कु. संजीवनी काळे | बी.ए. भाग १ | उपाध्यक्ष |
| ०४ | कु. प्रिया हिवाळे | बी.ए. भाग २ | सहसचिव |
| ०५ | कु. नंदिनी यंगड | बी.ए.भाग ३ | सदस्य |
| ०६ | कु. प्रियंका जाधव | बी.ए. भाग ३ | सदस्य |
| ०७ | योगेश सोळंकी | बी.ए. भाग ३ | सदस्य |
| ०८ | विद्या मुंडलिक | बी.ए. भाग २ | सदस्य |
| ०९ | आकाश साळवे | बी.ए. भाग २ | सदस्य |
| १० | कु. लक्ष्मी वैष्णव | बी.ए. भाग १ | सदस्य |
| ११ | कु. अंकिता जाधव | बी.ए. भाग १ | सदस्य |
| १२ | कु. रश्मी बनचरे | बी.ए. भाग १ | सदस्य |
| १३ | निलेश पाटील | बी.ए. भाग २ | सदस्य |

सर्वानुमते उपरोक्त विद्यार्थी पदाधिकाऱ्यांची निवड करण्यात आली. मार्गदर्शक म्हणून डॉ. सुभाष गव्हाणे व डॉ. प्रफुल्ल गवई लाभले.

२. **चर्चासत्र :–**

दि. १५/ ०९/ २०१८ रोजी अर्वाचीन मराठी कविता या बी.ए.भाग १ च्या अभ्यासक्रमातील 'अर्वाचीन कविता' या कवितासंग्रहावर बी.ए.भाग १ च्या विद्यार्थ्यांसाठी चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले होते. काव्यसंग्रहातील कवितांवर ६ विद्यार्थ्यांनी निबंध लिहले वत्याचे वाचन करण्यात आले. त्यावर चर्चा करुन शेवटी डॉ. प्रफुल्ल गवई यांनी निबंध वाचक विद्यार्थ्यांचे अभिनंदन करुन अर्वाचीन कवितेवरील आपले विचार व्यक्त केले.

३. **साहित्य लेखन विषयक कार्यशाळा :–**

दि. १९/ १०/ २०१८ रोजी साहित्य लेखन विषयक कार्यशाळेचे आयोजन महाविद्यालयातील सर्व विद्यार्थ्यांसाठी करण्यात आले हाते. कार्यशाळेच्या दोन सत्रात विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्यासाठी चिखली परिसरातील ख्यातनाम कादंबरीकार श्री मिलींद जाधव तसेच कवी श्री. सत्य कुटे लाभले हाते. कार्यशाळेत महाविद्यालयातील १४० विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता. विद्यार्थ्यांना संबोधीत करतांना श्री मिलींद जाधव यांनी मानवी जीवनातील भाषेचे व साहित्याचे महत्व अधोरेखित केले. ते म्हणाले 'माणसाने जरी भाषा विकसीत केलेली असली तरी भाषेनेच माणूस विकसीत केला आहे.' उत्कृष्ठ लेखनासाठी वाचनाचे महत्व त्यांनी विशद केले. सत्य कुटे यांनी कविता जन्माला कशी येते यावर आपले भाष्य व्यक्त केले काही कविताही सादर केल्या.

४. **व्याख्यानमाला :–**

जानेवारी २०१९ मध्ये महाविद्यालयात मराठी भाषा पंधरवाडयाच्या निमीत्ताने दि ७/१/२०१९ रोजी दोन व्याख्यात्यांची व्याख्यानमाला आयोजित करण्यात आली. 'मराठी भाषेचे अंतरंग' या विषयावरील पाहिले व्याखान डॉ. अजय खडसे नारायणराव देशमुख महाविद्यालय चांदूर बाजार यांचे संपन्न झाले. मराठी भाषेचा वैभवशाली इतिहास विद्यार्थ्यांसमोर मांडून मराठी भाषेच्या विकासासाठी वाचन आणि दर्जेदार लेखन आवश्यक असल्याचे प्रतिपादन त्यांनी केले. दुसरे व्याख्यान अहमदनगर जिल्ह्यातील सुप्रसिध्द साहित्यिक श्री संजय बोरुडे यांचे झाले. त्यांनी मायबोलीचे महत्व सांगून साहित्यलेखनातूनही आपण मायेबोलीची सेवा करु शकतो असे वक्तव्य केले. व्याख्यानमालेचे प्रास्तविक व परिचय डॉ प्रफुल्ल गवई सुत्रसंचालन कु. अपुर्वा जाधव तर आभार डॉ.सुभाष गव्हाणे यांनी व्यक्त केले.

५. **कविसंमेलन :–**

दि. २५ जानेवारी २०१९ रोजी स्नेहसंमेलनांतर्गत कविसंमेलनाचे आयोजनक करण्यात आले होते. यावेळी महाविद्यालयातील १८ विद्यार्थी कवींनी आपल्या कविता मोठया उत्सुर्फतपणे सादर केल्या.यामध्ये कु कल्याणी भोसले प्रथम, निलेश जाधव व्दितीय, विशाल परिहार तृतीय यांनी बक्षीसे प्राप्त केली. परिक्षक म्हणून डॉ. सुभाष गव्हाणे व डॉ.सुरेश माळशिखरे यांनी कार्य केले.

६. **निबंध स्पर्धा :–**

जानेवारी २०१९ मध्ये मंडळाचे वतीने 'वृक्षवल्ली आम्हा सोयरे' या विषयावर महाविद्यालयीन विद्यार्थ्यांसाठी निबंध स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. परिक्षक म्हणून डॉ. सुभाष राऊत व डॉ. नागेश गायकवाड यांनी कार्य केले. या स्पर्धेत २०१ रुपयांचा प्रथम पुरस्कार अंकुश अंभोरे, बी.कॉम ३ , व्दितीय पुरस्कार १५१ रुपये अजय मानकर, बी कॉम २, तृतीय पुरस्कार १०१ रु यास्मीन नवरंगी हिने पटकावला. पुरस्कार डॉ. सुभाष गव्हाणे यांनी प्रायोजित केलेत.

७. **मराठी भाषा दिन :–**

दि. २७ फेब्रुवारी २०१९ रोजी मराठी भाषा दिन मोठया उत्साहात संपन्न झाला. यावेळी प्रा. बळीराम खरात वक्ते म्हणून लाभले. प्रास्तविक व परिचय डॉ. सुभाष गव्हाणे यांनी करुन दिला. प्रा खरात सरांनी यावेळी मातृभाषेचे महत्व विशद करुन मराठी भाषेला पुर्ववैभव प्राप्त करुन देण्यासाठी विद्यार्थ्यांना आवाहन केले. अशाप्रकारे वर्षभरात विविध उपक्रमांव्दारे वाङमयमिरुची वाढवण्याचे कार्य मंडळामार्फत करण्यात आले.

८. **विद्यार्थी सहभाग** : १) १ मार्च २०१९ रोजी कर्मवीर भाउसाहेब हिरे कला व वाणिज्य महाविद्यालय मालेगांव ता. नाशिक येथे राज्यस्तरीय काव्य वाचन स्पर्धेत गजानन अंबादास रत्नपारखी व निलेश समाधान जाधव यांनी सहभाग घेतला.
२) ८ मार्च २०१९ रोजी श्री शिवाजी महाविद्यालय चिखली येथील महिला दिनानिमित्त आयोजित राज्यस्तरीय निबंध स्पर्धेत सुनिल किसन जाधव आणि कु. पूजा बावस्कर यांनी सहभाग नोंदविला.
३) श्री सुंदरा लक्ष्मी राजमाता फाउंडेशन उमरखेड जि. यवतमाळ आयोजित 'आई' विषयावर कथा लेखन स्पर्धेत सूरज मदनलाल पांडे याने सहभाग घेतला.

**प्रा.डॉ.प्रफुल्ल गवई**
मराठी विभाग

**प्रा.डॉ.सुभाष गव्हाणे**
मराठी वाङ्मय मंडळ
व विभाग प्रमुख

# अंकुर  भीत्ती पत्रक विमोचन






# मराठी भाषेचे अंतरंग व्याख्यानमाला




